ई-गव्हर्नन्स प्रकल्पा अंतर्गत NIC च्या
खर्चास प्रशासकीय मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
शालेय शिक्षण व क्रीडा विभाग
क्रमांक : ईगव्ह १५१८/ प्र.क्र.१५/ संगणक
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : २८ मार्च, २०१८

प्रस्तावना :

शालेय शिक्षण विभागासाठी ई गव्हर्नन्स अंतर्गत बहुउपयोगी सरल संगणक प्रणाली तयार करण्याची जबाबदारी NIC, पुणे यांचेकडे सोपविण्यात आली आहे. तसेच शिक्षकांची वैयक्तीक मान्यता, शिक्षक समायोजन इ. माहिती संगणक प्रणालीवर भरण्याचे काम केले जाते. याकरिता National Informetics Centre Services Inc (NICSI) दिल्ली या संस्थेमार्फत Programmer उपलब्ध करुन दिले जातात. सदर कामासाठी NIC, पुणे या संस्थेला उपलब्ध प्रोग्रामरसाठी रु. १,२३,३२,४०८/- (रुपये एक कोटी तेवीस लाख बत्तीस हजार चारशे आठ फक्त) इतका निधी मान्य करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

शिक्षण (आयुक्त), पुणे यांनी ई गव्हर्नन्स प्रकल्पांतर्गत NIC, पुणे या संस्थेच्या संगणक प्रणालीसाठी येणाऱ्या खर्चाचे Profoma invoice सादर केलेले आहे. त्यानुसार सन २०१८-१९ साठी अपेक्षित एकूण खर्च खालीलप्रमाणे आहे:-

अ.क्र.	कालावधी	एकूण रक्कम
१.	१.४.२०१८ ते ३०.९.२०१८	रुपये ७९,१४,११९/- (जीएसटी १८ टक्के सह)
२.	१.१०. २०१८ ते ७.१.२०१९	रुपये ४४,१८,२८९/- (जीएसटी १८ टक्के सह)
	एकूण रक्कम	रुपये १,२३,३२,४०८/-

आयुक्त (शिक्षण) यांनी सादर केलेल्या प्रस्तावानुसार NIC, पुणे यांच्याकडून सरल प्रणालीचे कामकाज व्यवस्थित पार पाडण्यासाठी सन २०१८-१९ साठी एकूण २८ प्रोग्रामर्सची आवश्यकता आहे. या प्रोग्रामसाठी, NIC, पुणे या संस्थेने संगणक प्रणालीसाठी सादर केलेल्या देयकाप्रमाणे एकूण रुपये १,२३,३२,४०८/- (रुपये एक कोटी तेवीस लाख बत्तीस हजार चारशे आठ फक्त) इतकी रक्कम अदा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर खर्च मागणी क्रमांक ई-२, २२०२ सर्वसाधारण शिक्षण, ८०-सर्वसाधारण शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०२)(५१) ई-गव्हर्नन्स कार्यक्रम (२२०२ H ४५४) ३१ सहायक अनुदाने या लेखाशिर्षातून सन २०१७-१८ च्या उपलब्ध तरतुदीमधुन भागविण्यात यावा. यासाठी आयुक्त (शिक्षण) यांना नियंत्रक अधिकारी व शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) कार्यालयातील सहायक संचालक, लेखा यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. NIC कडून सादर करण्यात आलेल्या देयकांची तपासणी करुन त्यांच्या कामाबाबत खात्री करुन मानधन अदा करण्यात यावे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेताक २०१८०३२८१६१३०१२०२१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने

Pravin Rajaram Mundhe

Digitally signed by Pravin Rajaram Mundhe
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=8cc298cb2ba38f035e6bd1a51789c7ed1ed4f4fce865eda3495969f77d97c89a, cn=Pravin Rajaram Mundhe
Date: 2018.03.28 16:14:43 +05'30'

(प्रविण मुंढे)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. अमुस, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२. प्र. स., माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
३. आयुक्त शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. सहायक संचालक, लेखा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १ / २
६. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर १ / २
७. जिल्हा कोषागार अधिकारी, पुणे
८. निवडनस्ती संगणक.